■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 80 ■ शनिवार , 13 जून 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com




छायाचित्र ; गजानन तोडकर, कळंब,
संकलन: अमोलसिंह चंदेल, शिराढोण

# मांजरा पट्ट्याला समृद्धीचे तोरण

**एकेकाळी पावसाच्या भरवशावर असलेला मांजरा धरण परिसर हिरवाईने नटला आहे. मांजरा धरणामुळे हजारो हेक्टर शेतीला सिंचनाची सुविधा मिळाली आणि शेतकऱ्यांच्या जीवनात मोठा बदल घडला. जिथे दुष्काळ ही ओळख होती, तिथे आज ऊस, फळबागा आणि भाजीपाल्याची शेती बहरताना दिसते. मांजरा हा केवळ जलस्रोत नसून ग्रामीण विकासाचा आधार बनला आहे**

## ४३ वर्षाचे धरण, हजारो हेक्टरला लाभ

१९८२ मध्ये उभारलेल्या मांजरा धरणाची साठवण क्षमता २२४.०९३ दशलक्ष घनमीटर आहे. धरणाच्या ९० कि.मी. डाव्या आणि ७८ कि.मी. उजव्या कालव्याद्वारे सुमारे १८ हजार २२३ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळतो. धाराशिव आणि बीड जिल्ह्यांच्या सीमेवरील हा प्रकल्प मराठवाड्यातील महत्त्वाच्या सिंचन योजनांपैकी एक मानला जातो. प्रकल्प झाल्यापासून सभोवताल असा हिरव्याशार निसर्गाने बहरून गेला आहे.

## पावसाने आशा पल्लवित

पहिल्या पावसानंतर मांजरा धरण परिसरात दिसणारी हिरवाई ही शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी असते. धरणातील जलसाठा वाढल्यानंतर परिसरातील बागायती शेतीला दिलासा मिळतो.शिवाय आजूबाजूच्या खेड्यांसह मोठ्या शहरांना पाण्याचा आधार होतो. त्यामुळे पावसाचा प्रत्येक थेंब आणि धरणातील प्रत्येक वाढता फूट हा शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणणारा ठरतो.

# एल निनोच्या सावटात धाराशिवचा जलसंकल्प; ७११ गावांत एक लाख जलतारा खड्ड्यांचे लक्ष्य

## दीड महिन्यात ८७६२ जलतारा खड्डे पूर्ण

## भूजलवाढीचा नवा मंत्र ठरतोय 'जलतारा'

सज्जन यादव । आरंभ मराठी

**धाराशिव : यंदाच्या पावसाळ्यावर 'एल निनो'चे संकट घोंघावत असल्याने राज्यासह मराठवाड्यात कमी पावसाची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर भविष्यातील जलटंचाई टाळण्यासाठी आणि भूजल पातळी वाढविण्यासाठी धाराशिव जिल्हा प्रशासनाने 'जलयुक्त शिवार' अभियानांतर्गत महत्त्वाकांक्षी 'जलतारा' योजना हाती घेतली आहे. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील आठही तालुक्यांतील ७११ गावांमध्ये तब्बल एक लाख जलतारा खड्डे तयार करण्याचे नियोजन करण्यात आले असून, अवघ्या दीड महिन्यात ११८ गावांमध्ये ८ हजार ७६२ खड्ड्यांची निर्मिती करण्यात आली आहे.**

धाराशिव जिल्ह्यात दरवर्षी पावसाचे प्रमाण अनिश्चित राहते. काही भागांत अतिवृष्टी तर काही भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण होते. अशा परिस्थितीत पडणाऱ्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक बनले आहे. याच उद्देशाने प्रशासनाने जलतारा योजनेच्या माध्यमातून शेतातच पाणी अडविणे आणि जमिनीत मुरविण्याचा व्यापक कार्यक्रम सुरू केला आहे. भूजल पातळी वाढविण्यासाठी आणि विहिरी, कूपनलिका तसेच जलस्रोतांना नवसंजीवनी देण्यासाठी प्रत्येक गावातील पाण्याचा निचरा होणाऱ्या ठिकाणी आणि अधिक पाणी साठू शकणाऱ्या भागांमध्ये जलतारा खड्डे तयार केले जात आहेत. यामुळे पावसाचे पाणी थेट जमिनीत झिरपून भूजल पुनर्भरणाला चालना मिळणार आहे.या प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कृषी विभाग, महसूल विभाग आणि ग्रामविकास विभाग या तीन प्रमुख विभागांना जबाबदारी देण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि तालुका कृषी अधिकारी मागील दीड महिन्यांपासून युद्धपातळीवर काम करत आहेत. विशेष म्हणजे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार स्वतः दररोज या कामांचा आढावा घेत असून प्रकल्पाची प्रगती नियमितपणे तपासत आहेत. त्यामुळे अल्पावधीत मोठ्या प्रमाणात काम पूर्ण होऊ शकले आहे.जलतारा हा पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी तयार करण्यात येणारा विशेष शोषखड्डा आहे. साधारणतः एका एकर क्षेत्रासाठी योग्य ठिकाण निवडून पाच फूट लांब, पाच फूट रुंद आणि सहा फूट खोल असा खड्डा खोदला जातो. या खड्ड्यामध्ये साडेपाच फूट उंचीपर्यंत काळ्या पाषाणाचे दगड भरले जातात. पावसाळ्यात शेतातील अतिरिक्त पाणी या खड्ड्यात जमा होते आणि दगडांच्या फटीतून जमिनीत झिरपत राहते. त्यामुळे पाण्याचा अपव्यय टळतो आणि भूजल पुनर्भरणाची प्रक्रिया वेगाने होते. धाराशिव जिल्ह्यात सरासरी ७०० मिलीमीटर पाऊस पडतो. या प्रमाणात पाऊस झाल्यास एका जलतारा खड्ड्याद्वारे सुमारे ३ लाख ४० हजार लिटर पाणी जमिनीत झिरपते. यामुळे जमिनीतील ओलावा दीर्घकाळ टिकून राहतो. भूजल पातळी वाढते, सूक्ष्मजीवांची क्रिया सुधारते आणि जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होते. याचा सकारात्मक परिणाम केवळ पाणीसाठ्यावरच नाही तर शेती उत्पादनावरही दिसून येतो. जलतारा प्रकल्पामुळे शेती उत्पादनात तब्बल ४२ टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते.



### सामाजिक संस्थांचेही भरीव सहकार्य

जलतारा प्रकल्पाची व्याप्ती मोठी असल्याने निधीची अडचण निर्माण होण्याची शक्यता होती. मात्र जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी सामाजिक संस्था आणि स्वयंसेवी संघटनांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत नाम फाउंडेशन आणि ज्ञानप्रबोधिनी या संस्थांनी पुढाकार घेतला. जलतारा खड्डे खोदण्यासाठी आवश्यक असलेल्या जेसीबी यंत्रांच्या इंधनाची व्यवस्था या संस्थांनी केली. विशेष म्हणजे देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे काही ठिकाणी इंधन टंचाईची समस्या निर्माण झाली असतानाही धाराशिव जिल्ह्यातील जलतारा प्रकल्पाचे काम एकाही दिवशी बंद पडले नाही. प्रशासन आणि सामाजिक संस्थांच्या समन्वयामुळे हे अभियान सातत्याने सुरू राहिले.

### रखरखत्या उन्हातही कामाचा वेग कायम

मे महिन्याच्या सुरुवातीला या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला. उन्हाळ्याच्या तीव्र झळा आणि तापमानाचा पारा चाळिशीच्या पुढे असतानाही प्रशासनाने कामाचा वेग कमी होऊ दिला नाही. दररोज जिल्ह्यातील आठ तालुक्यांमध्ये सरासरी २०० जलतारा खड्डे खोदण्यात आले. तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि कृषी अधिकाऱ्यांना स्वतंत्र उद्दिष्टे देण्यात आल्याने प्रत्येक विभागाने जास्तीत जास्त काम पूर्ण करण्यावर भर दिला. परिणामी अल्प कालावधीत हजारो खड्ड्यांची निर्मिती शक्य झाली. दिनांक ७ जूनपर्यंत ११८ गावांमध्ये ८,७६२ जलतारा खड्डे तयार करण्यात आले आहेत.

### शाश्वत विकासाचा मजबूत पाया

जलतारा योजना ही केवळ पाणी साठवणुकीची योजना नसून ग्रामीण भागातील शाश्वत विकासाचा पाया ठरणारी चळवळ ठरत आहे. पावसाचे प्रत्येक थेंब जिरविणे, भूजल पातळी वाढविणे, विहिरी आणि कूपनलिकांना पुनर्जीवित करणे तसेच शेती उत्पादनवाढीस चालना देणे या सर्व उद्दिष्टांची पूर्तता या उपक्रमातून होणार आहे.एल निनोच्या संभाव्य परिणामांना सामोरे जाण्यासाठी धाराशिव जिल्हा प्रशासनाने उचललेले हे पाऊल भविष्यात फायदेशीर ठरणार आहे.

### आतापर्यंत तालुकानिहाय झालेले काम

| तालुका | - | गावे | - | जलतारा खड्डे |
|---|---|---|---|---|
| धाराशिव | - | २८ | - | १,२९० |
| तुळजापूर | - | १४ | - | २,११५ |
| उमरगा | - | १८ | - | ३१३ |
| लोहारा | - | १६ | - | ३,१९२ |
| भूम | - | ११ | - | ३१९ |
| परंडा | - | ६ | - | ४३० |
| कळंब | - | १९ | - | ५८२ |
| वाशी | - | ६ | - | ५२१ |
| एकूण | - | ११८ | - | ८,७६२ |

## लग्नाच्या आमिषाने 27.54 लाखांची फसवणूक

### 50 लाखांच्या खंडणीची मागणी, नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

आरंभ मराठी । धाराशिव

लग्नाच्या आमिषाने फसवणूक करून लाखो रुपयांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम घेऊन गेल्याप्रकरणी तसेच 50 लाख रुपयांच्या खंडणीची मागणी केल्याच्या आरोपावरून आनंदनगर पोलीस ठाण्यात नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शिवराज संग्राम पाटील (रा. सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासकीय निवासस्थान भाग्यनगर, धाराशिव) यांनी 11 जून 2026 रोजी आनंदनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादीनुसार, आरोपी महेश जनार्धन पाटील (रा. शगुन सिटी, कौठा, नांदेड), नविनकुमार मारुतीराव पाटील (रा. बन्नाळी, ता. धर्माबाद, जि. नांदेड), सुंदरबाई गंगाधर पाटील (रा. देगलुर), शंकर नागोराव खपाटे (रा. बन्नाळी), शुभांगी उर्फ साक्षी मच्छिंद्रनाथ वारले (रा. वाधी), शिवम खरबुजे (रा. भंडारपल्ली, मंडळ बोधन, जि. निजामाबाद, तेलंगणा), तसेच गोरखनाथ वारले, जालिंदरनाथ वारले आणि शुभम वारले (रा. वाणीजवळ, मंडळ तानुर, जि. निर्मल, तेलंगणा) यांनी संगनमत करून फिर्यादीशी लग्न लावून दिले. त्यानंतर लग्नानंतर फिर्यादीच्या घरातून 17 तोळे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण 27 लाख 54 हजार रुपयांचा मुद्देमाल अप्रामाणिकपणे घेऊन गेल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. याशिवाय फिर्यादीची प्रतिमा व पदाची बदनामी करण्याची धमकी देत 50 लाख रुपयांच्या खंडणीची मागणी केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 308(2), 308(5), 308(6), 318(4), 303(2), 352, 351(2), 61(2) व 3(5) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास आनंदनगर पोलीस करीत आहेत.

आरंभ मराठी

### 150 हून अधिक जलाशयांतून गाळ काढण्याची संधी हुकली; शेतकऱ्यांतून संताप व्यक्त

# गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार मोहीम कागदावरच; उपक्रम ठप्प


धाराशिवः महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणारी 'गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार' ही महत्त्वाकांक्षी मोहीम यंदा धाराशिव जिल्ह्यात केवळ कागदोपत्रीच राहिल्याचे चित्र दिसून येत आहे. मागील काही वर्षांपासून या योजनेला जिल्ह्यातील शेतकरी आणि ग्रामस्थांचा चांगला प्रतिसाद मिळत होता. मात्र, यावर्षी या योजनेसाठी निधीची तरतूद करण्यात आलेली नसल्याने प्रत्यक्षात कामांना सुरुवातच होऊ शकलेली नाही. या मोहिमेअंतर्गत तलाव, बंधारे आणि जलाशयांमधील गाळ काढून तो शेतकऱ्यांच्या शेतात टाकला जातो. त्यामुळे जलाशयांची पाणीसाठवण क्षमता वाढण्याबरोबरच शेतजमिनीचा पोत



सुधारण्यास मदत होते. याशिवाय गाळ वाहतुकीसाठी शासनाकडून विशेष अनुदान दिले जात असल्याने शेतकऱ्यांचा खर्चही कमी होतो. मात्र, यंदा निधीअभावी हा लाभ शेतकऱ्यांना मिळू शकत नसल्याची खंत व्यक्त होत आहे. धाराशिव जिल्ह्यात लघु, मध्यम आणि मोठे असे एकूण 223 जलप्रकल्प आहेत. मागील वर्षी विक्रमी पाऊस झाल्यानंतरही उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे अनेक जलाशयांतील पाणीसाठा झपाट्याने घटला आहे. सध्या जिल्ह्यातील 70 जलाशय पूर्णपणे कोरडे पडले असून 50 हून अधिक जलाशयांमध्ये 25 टक्क्यांपेक्षा कमी पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे 223 पैकी 150 हून अधिक जलाशयांमधून गाळ काढण्याचे काम सहज शक्य होते. वेळेत गाळ उपसा केल्यास जलाशयांची जलधारण क्षमता मोठ्या प्रमाणात वाढू शकते. आगामी पावसाळ्यात अधिक पाणी साठविणे शक्य होऊन दुष्काळी परिस्थितीवर काही प्रमाणात मात करता येऊ शकते. तसेच शेतकऱ्यांच्या जमिनीची सुपीकता वाढण्यासही मदत झाली असती. मात्र, योजनेसाठी निधी उपलब्ध न झाल्याने ही संधी हुकल्याचे बोलले जात आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमधून याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे. जलसंधारणासारख्या महत्त्वाच्या विषयाकडे होत असलेल्या दुर्लक्षामुळे जिल्ह्याच्या दीर्घकालीन जलव्यवस्थापनावर परिणाम होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. यंदा पावसाळा उशिरा सुरू होत असल्यामुळे गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार योजना प्रभावीपणे राबविण्यात आली असती, तर जलाशयांतील पाणीसाठा वाढविण्याबरोबरच हजारो शेतकऱ्यांना सुपीक गाळाचा लाभ मिळाला असता. मात्र, प्रशासकीय आणि राजकीय अनास्थेमुळे धाराशिव जिल्हा या महत्त्वाच्या योजनेपासून वंचित राहिला आहे.

## स्टाग्रामवर 'सॉरी डार्लिंग' स्टोरी टाकून तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

आरंभ मराठी । तामलवाडी



तुळजापूर तालुक्यातील गंजेवाडी येथील २५ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी (दि.१२) दुपारच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, गंजेवाडी येथील बाळासाहेब दत्तात्रय दळवी (वय २५) यांनी सांगवी (काटी) शिवारातील जम्मू पंजाब ढाब्यासमोर उभ्या असलेल्या आयशर टेम्पोमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून विविध अंगांनी तपास सुरू आहे. विशेष म्हणजे आत्महत्येपूर्वी बाळासाहेब यांनी त्यांच्या इंस्टाग्राम खात्यावर 'सॉरी डार्लिंग' या आशयाची स्टोरी पोस्ट केली होती. या स्टोरीमुळे आत्महत्येमागील कारणांबाबत विविध तर्क-वितर्क व्यक्त केले जात असले तरी याबाबत अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. स्थानिक पोलीस पाटील यांनी दिलेल्या खबरीवरून तामलवाडी पोलीस ठाण्यात मृत्यूची प्राथमिक नोंद करण्यात आली आहे.

# रोजगार व उद्योग क्षेत्राच्या व्यापक सर्वेक्षणाचा शुभारंभ

## नागरिकांनी अचूक माहिती देऊन सहकार्य करण्याचे आवाहन



आरंभ मराठी । धाराशिव

देशातील रोजगार, बेरोजगारी तसेच असंघटित क्षेत्राच्या आर्थिक स्थितीबाबत अद्ययावत आणि विश्वासार्ह माहिती उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाच्या सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयामार्फत नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण 2026 आणि असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण 2026 राबविण्यात येत आहे. या महत्त्वपूर्ण सर्वेक्षण उपक्रमाचा शुभारंभ शुक्रवारी (दि.१२) जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या हस्ते करण्यात आला. या सर्वेक्षणांच्या माध्यमातून देशातील रोजगार, बेरोजगारी, स्वयंरोजगार, उद्योग-व्यवसाय आणि असंघटित क्षेत्रातील आर्थिक घडामोडींची अचूक माहिती संकलित केली जाणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध धोरणांच्या आखणीसाठी तसेच रोजगार निर्मिती व उद्योगविकासाशी संबंधित निर्णय प्रक्रियेसाठी या सर्वेक्षणातील माहिती महत्त्वाची ठरणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, सर्वेक्षणासाठी भेट देणाऱ्या अधिकृत कर्मचाऱ्यांना आवश्यक ती माहिती प्रामाणिकपणे व अचूकपणे उपलब्ध करून द्यावी. नागरिकांच्या सहकार्यामुळेच रोजगार व उद्योग क्षेत्राचे वास्तव चित्र समोर येण्यास मदत होणार असून विकासाभिमुख धोरणे अधिक परिणामकारकपणे राबविता येतील. या कार्यक्रमास जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) स्वाती शेंडे, जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे उपसंचालक सुधाकर जाधव तसेच जिल्हा सांख्यिकी कार्यालय आणि जिल्हा नियोजन समिती कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# १ ऑगस्टपासून महिला व ज्येष्ठ नागरिकांना बस प्रवासासाठी NCMC स्मार्ट कार्ड बंधनकारक

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

आरंभ मराठी । मुंबई





महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासी सेवांमध्ये अधिक पारदर्शकता, सुलभता आणि डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी १ ऑगस्ट २०२६ पासून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिक प्रवाशांसाठी NCMC (National Common Mobility Card) स्मार्ट कार्ड बंधनकारक करण्यात येणार आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर राज्यभर NCMC स्मार्ट कार्ड नोंदणी आणि वितरण मोहिमेला वेग आला आहे. आतापर्यंत राज्यातील सुमारे ५१ लाख नागरिकांनी NCMC स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली असून त्यापैकी सुमारे २५ लाख स्मार्ट कार्ड कार्यान्वित करण्यात आले आहेत. उर्वरित नोंदणीकृत लाभार्थ्यांची कार्डेही लवकरच सुरू करण्यात येत असल्याने लाभार्थ्यांनी विलंब न करता आपली प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी आणि कार्ड वितरण प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी राज्यभरात ४ हजारांहून अधिक NCMC स्मार्ट कार्ड वितरण केंद्रे कार्यरत आहेत. ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिकांना सहजपणे कार्ड उपलब्ध व्हावे यासाठी ही केंद्रे सक्रियपणे सेवा देत आहेत. दरम्यान, NCMC स्मार्ट कार्डच्या वितरणामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार खपवून घेतला जाणार नसल्याचा इशाराही मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. विहित शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारून स्मार्ट कार्डची विक्री करणाऱ्या वितरण केंद्रांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून अशा केंद्रांचा वितरण परवाना तत्काळ रद्द करण्यात येईल,असे त्यांनी स्पष्ट केले. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांना शासनाच्या विविध प्रवासी सवलतींचा लाभ सुरळीतपणे मिळावा, तिकीट वितरण प्रक्रियेत पारदर्शकता यावी आणि प्रवास व्यवस्थापन अधिक आधुनिक व्हावे, या उद्देशाने NCMC स्मार्ट कार्ड प्रणाली राबविण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांनी १ ऑगस्टपूर्वी आपले NCMC स्मार्ट कार्ड प्राप्त करून ते कार्यान्वित करून घ्यावे,असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे. राज्य परिवहन व्यवस्थेच्या डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वपूर्ण पाऊल असून आगामी काळात अधिकाधिक प्रवासी या स्मार्ट प्रणालीशी जोडले जाणार आहे.

# जिल्हा सहकार बोर्डाच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल नेताजी कवठे यांचा सत्कार



आरंभ मराठी । उमरगा

धाराशिव जिल्हा सहकार बोर्डाच्या संचालकपदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार नेताजी निळकंठ कवठे यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने सत्कार करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. सुरेश दाजी बिराजदार यांनी शुक्रवारी (दि.12) त्यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन गौरव करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा युवक अध्यक्ष दिग्विजय शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष भीमा स्वामी, युवानेते रामकृष्ण बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती. नेताजी निळकंठ कवठे हे मुरूम कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक असून त्यांची उमरगा तालुक्याचे प्रतिनिधी म्हणून धाराशिव जिल्हा सहकार बोर्डाच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाली आहे. सहकार क्षेत्रात त्यांनी अनेक वर्षांपासून विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्या तसेच सहकार बोर्डाच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य केले आहे. सत्कार समारंभास भाऊसाहेब बिराजदार अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश शहापुरे, उमरगा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुभाष गायकवाड, मारुती पाटील, रणजीत गायकवाड, मोहन शिंदे, प्रदीप गावकरी, शिवराज मदने यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सहकार क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ॲट्रॉसिटी व छेडछाडीच्या खोट्या गुन्ह्याची धमकी देत पाच लाखांची खंडणी मागितल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

**तुळजापूर** :- तुळजापूर तालुक्यातील काक्रंबा शिवारात एका ज्येष्ठ शेतकऱ्याकडे ॲट्रॉसिटी व छेडछाडीचा खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देत पाच लाख रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मनोहर दासराव काळे (वय 75, रा. वासुदेव गल्ली, भवानी रोड, तुळजापूर) हे दिनांक 8 जून 2026 रोजी सकाळी काक्रंबा शिवारातील गट क्रमांक 785 मधील शेतात गेले होते. त्यावेळी आरोपी आकाश मस्के व सुरेश मस्के (दोघे रा. काक्रंबा, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) हे उसाच्या शेतात जनावरे चारत असल्याचे दिसून आले. फिर्यादी यांनी आरोपींना उसात जनावरे चारू नका, असे सांगितल्याचा राग मनात धरून आरोपींनी त्यांच्याकडे दोन दिवसांच्या आत पाच लाख रुपये देण्याची मागणी केली. तसेच पैसे न दिल्यास जमीन त्यांच्या नावावर करून देण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न केला. याशिवाय फिर्यादी व त्यांच्या मुलाविरुद्ध ॲट्रॉसिटी आणि छेडछाडीचा खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देत खंडणी मागितल्याचा आरोप फिर्यादींनी केला आहे. याप्रकरणी मनोहर काळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात आरोपी आकाश मस्के व सुरेश मस्के यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 308(2), 352, 351(2) व 3(5) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# तंबाखूविरोधी जनजागृतीसोबत धडक कारवाई; धाराशिवमध्ये 12 ठिकाणी कोटपा कायद्याची अंमलबजावणी

आरंभ मराठी । धाराशिव



तंबाखूजन्य पदार्थांच्या वाढत्या वापरामुळे निर्माण होणारे आरोग्यविषयक धोके लक्षात घेता राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत धाराशिवमध्ये जनजागृती आणि कायद्याच्या अंमलबजावणीची प्रभावी मोहीम राबविण्यात आली. जिल्हा रुग्णालय धाराशिव, शहर पोलीस ठाणे आणि मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम पार पडला. जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात स्वाक्षरी अभियानाचे आयोजन करण्यात आले. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकुरकर व निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य संपर्क) डॉ. शिवाजी फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या अभियानाची सुरुवात जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा महाडळकर यांच्या स्वाक्षरीने करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत तंबाखूमुक्त समाज घडविण्याचा निर्धार व्यक्त केला. याच दिवशी राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कोटपा (COTPA) २००३ कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. शहर पोलीस ठाण्याच्या सहकार्याने तंबाखू नियंत्रण अंमलबजावणी पथकाने सावरकर चौक, काळा मारुती चौक, अंबाला चौक, बार्शी नाका चौक यासह शहरातील १२ ठिकाणी तपासणी मोहीम राबवून नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली. सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान, अल्पवयीनांना तंबाखू विक्री, शैक्षणिक संस्थांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री तसेच कायद्याने आवश्यक असलेले फलक न लावणे अशा बाबींची तपासणी करण्यात आली. या मोहिमेत डॉ. विक्रांत राठौर, डॉ. धुमाळ, अनिल गुंज, प्रदीप तटाळे, श्रीनिवास निर्मळ तसेच पोलीस कर्मचारी कुंभार व माळी यांनी सहभाग घेतला. तंबाखू नियंत्रण कायद्याची कठोर अंमलबजावणी करत जनजागृतीची ही मोहीम संपूर्ण जिल्ह्यात नियमितपणे राबविण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

# उद्या शहरातील १९ परीक्षा केंद्रांवर होणार एमपीएससी ची पूर्वपरीक्षा

आरंभ मराठी । धाराशिव

महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ रविवारी (दि.१४) सकाळी ११ ते १२ या वेळेत धाराशिव शहरातील १९ परीक्षा केंद्रांवर होणार आहे. या परीक्षेसाठी एकूण ५ हजार २८० परीक्षार्थी बसणार आहेत. परीक्षेच्या पार्श्वभूमीवर केंद्र परिसरात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. धाराशिव येथील श्रीपतराव भोसले हायस्कूल, रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, छत्रपती शिवाजी हायस्कूल, जिल्हा परिषद कन्या प्रशाला, श्री श्री रविशंकर विद्यामंदिर, विद्यामाता हायस्कूल, तेरणा पब्लिक स्कूल, शासकीय तंत्रनिकेतन, अभिनव इंग्लिश स्कूल, ग्रीनलँड पब्लिक स्कूल, पोदार इंटरनॅशनल स्कूल, टीपीसीटी अभियांत्रिकी महाविद्यालय, भारत विद्यालय, के.टी. पाटील फार्मसी महाविद्यालय, व्ही.जे.शिंदे पॉलिटेक्निक कॉलेज आदी केंद्रांवर परीक्षा होणार आहे. परीक्षार्थ्यांना कोणताही अडथळा निर्माण होऊ नये तसेच बाह्य हस्तक्षेप टाळण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात विशेष निर्बंध लागू करण्यात आले आहेत. याशिवाय परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर, टायपिंग सेंटर, एसटीडी बूथ, कॉम्प्युटर सेंटर,इंटरनेट कॅफे, ध्वनिक्षेपक तसेच तत्सम सुविधा बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मोबाईल फोन,सेल्युलर फोन,फॅक्स, ई-मेल किंवा इतर प्रसार माध्यमांची साधने घेऊन परीक्षा केंद्रात प्रवेश करण्यासही बंदी राहणार आहे.

# वेश्या व्यवसाय सुरू असलेल्या नायगाव शिवारातील रॉयल लॉजवर पोलिसांचा छापा

## दोघांविरुद्ध गुन्हा, दोन महिलांची सुटका

आरंभ मराठी । शिराढोण

शिराढोण पोलीस ठाण्याच्या पथकाने नायगाव शिवारातील रॉयल लॉजवर छापा टाकून सुरू असलेल्या अनैतिक देहव्यापाराचा पर्दाफाश केला. या कारवाईत दोन महिलांची सुटका करण्यात आली असून लॉजशी संबंधित दोन जणांविरुद्ध मानवी अनैतिक व्यवसाय प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक रितु खोखर व अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिराढोण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कोळेकर यांच्या पथकाने ११ जून रोजी अवैध धंद्यांविरोधात गस्त सुरू असताना ही कारवाई केली. गुप्त माहितीदारामार्फत नायगाव ते मुरुड रस्त्यावरील रॉयल लॉजमध्ये काही महिलांकडून देहव्यापार करून घेत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहितीची खात्री करण्यासाठी पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून पडताळणी केली. त्यानंतर सायंकाळी लॉजवर छापा टाकण्यात आला. छाप्यामध्ये दोन महिला आढळून आल्या. महिला पोलिसांनी त्यांची चौकशी केली असता, आरोपींच्या सांगण्यावरून त्यांना वाणिज्यिक लैंगिक शोषणासाठी आश्रय देण्यात येत असल्याचे समोर आले. या प्रकरणी अक्षय दादासाहेब घोगरे (रा. मुरुड, ता. जि. लातूर) व लॉज व्यवस्थापक अजय अच्युत रसाळ (रा. मुरुड, ता. जि. लातूर) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातून मोबाईल फोन, नोंदणी रजिस्टर, ५ हजार ३०० रुपयांची रोख रक्कम व निरोधाचे पाकीट असा एकूण १५ हजार ४२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सुटका करण्यात आलेल्या महिलांना संरक्षण देण्यात आले असून आरोपींविरुद्ध गुन्हा क्रमांक १४१/२०२६ अन्वये बीएनएसच्या संबंधित कलमांसह मानवी अनैतिक व्यवसाय प्रतिबंधक अधिनियमातील कलम ३, ४, ५ व ६ अंतर्गत तामलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बंद बोअरवेलला नवसंजीवनी; कळंबच्या जलसुरक्षेसाठी नगराध्यक्ष सुनंदाताई कापसे यांचा दूरदृष्टीपूर्ण उपक्रम

## री-बोअरिंग मोहिमेला यश; कळंबमध्ये बंद जलस्रोत पुन्हा झाले कार्यान्वित

आरंभ मराठी । कळंब

कळंब शहरातील नागरिकांना भविष्यातील पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी नगराध्यक्ष सुनंदाताई कापसे यांनी बंद पडलेल्या जुन्या बोअरवेलचे पुनर्जीवन करण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. अनेक वर्षांपासून निष्क्रिय असलेल्या बोअरवेलचे री-बोअरिंग करून त्यांना पुन्हा कार्यान्वित करण्यात येत असून, या माध्यमातून शहरातील विविध भागांमध्ये पाण्याची उपलब्धता वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे.या उपक्रमांतर्गत शहरातील पोलीस लाईन वसाहत परिसर, आर्य समाज मंदिरासमोरील बोअरवेल तसेच प्रभाग क्रमांक ९ मधील चोंदे यांच्या घरासमोरील बंद अवस्थेतील बोअरवेलचे री-बोअरिंग करण्यात आले. विशेष म्हणजे या तिन्ही ठिकाणचे री-बोअरिंग यशस्वी ठरले असून संबंधित भागात पुन्हा मुबलक पाणी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या बोअरवेल बंद पडल्यामुळे परिसरातील नागरिकांना, विशेषतः उन्हाळ्यात आणि टंचाईच्या काळात, पाणीपुरवठ्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत होते. ही बाब लक्षात घेऊन नगरपालिकेच्या नियमित पाणीपुरवठ्याला पूरक व्यवस्था निर्माण व्हावी आणि भविष्यातील जलटंचाईची तीव्रता कमी व्हावी, या उद्देशाने नगराध्यक्ष कापसे यांनी पूर्वनियोजनातून हे काम हाती घेतले. वाढती लोकसंख्या, बदलते हवामान आणि वाढती पाण्याची मागणी यामुळे उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन व पुनरुज्जीवन करणे काळाची गरज बनली आहे. त्याच पार्श्वभूमीवर कळंब नगरपालिकेने बंद पडलेल्या जलस्रोतांना नवसंजीवनी देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे केवळ पाणीपुरवठ्याची समस्या कमी होणार नसून पर्यावरणपूरक जलव्यवस्थापनालाही चालना मिळणार आहे. या मोहिमेमुळे परिसरातील नागरिकांनी नगराध्यक्ष सुनंदाताई कापसे, पाणीपुरवठा सभापती भूषण करंजकर, पाणीपुरवठा विभाग तसेच सर्व नगरसेवकांचे आभार मानले आहेत.



### कापसे कुटुंबाची जलव्यवस्थापनातील विकासपरंपरा

दुष्काळी परिस्थितीत माजी नगराध्यक्ष शिवाजी आप्पा कापसे यांनी उभारलेली हवाई पाईपलाईन योजना राज्यभर पथदर्शी ठरली होती. शहराच्या पाणीप्रश्नावर त्यांनी केलेल्या कामाची आजही नागरिकांमध्ये चर्चा होते. त्याच विकासदृष्टीचा वारसा पुढे नेत नगराध्यक्ष सुनंदाताई कापसे यांनी आता बंद पडलेल्या जलस्रोतांचे पुनर्जीवन करण्याचा अभिनव उपक्रम राबविला आहे. उपलब्ध जलस्रोतांचे जतन आणि पुनर्वापर यावर आधारित हा उपक्रम कळंबच्या शाश्वत विकासाच्या दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. या मोहिमेसाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजी कापसे, पाणीपुरवठा सभापती भूषण करंजकर, गटनेते अतुल कवडे, नगरसेवक अमर चाऊस, नगरसेविका योजना वाघमारे आदी उपस्थित होते.

# पैसे देण्याचे आमिष दाखवून तरुणीचे अपहरण जबरदस्ती लग्न करून अत्याचार

आरंभ मराठी । लोहारा

पैसे देण्याचे आमिष दाखवून एका तरुणीला मोटारसायकलवरून घेऊन जात जबरदस्तीने लग्न करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना लोहारा तालुक्यात उघडकीस आली आहे. याप्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून लोहारा पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, एका गावातील पीडित तरुणीला दि. 3 जून 2026 रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास एका तरुणाने बसस्थानक परिसरातून 'पैसे देतो' असे सांगून मोटारसायकलवर बसवून नेले. त्यानंतर आरोपीने तिच्याशी जबरदस्तीने लग्न केल्याचा आरोप आहे. तसेच, पीडितेने त्याच्यासोबत राहण्यास नकार दिल्यानंतर तिला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. माझ्यासोबत राहिली नाहीस तर तुला ठार मारीन अथवा तुझ्या नावाची चिठ्ठी लिहून स्वतःला काहीतरी करेन, अशी धमकी देत आरोपीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, आरोपीने पीडितेच्या घरासमोर उभे राहून जातीवाचक शिवीगाळ केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. पीडितेने दिलेल्या फिर्यादीवरून लोहारा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 64(1), 115(2), 352, 351(2)(3) तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील कलम 3(1)(w), 3(2)(v), 3(1)(r) व 3(1)(s) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)

संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).

» पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,विबग्योर स्कुलशेजारी » कोल्हापूर कार्यालयः रिव्हॉल्युशन, दुसरा मजला, दाभोळकर कॉर्नर, स्टेशन रोड, करवीर.

# पेरणीपूर्व मशागतीची कामे पूर्ण; तेर परिसरातील शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत

## मृग नक्षत्रातील पावसावर खरीपाचे भवितव्य; आभाळाकडे लागले शेतकऱ्यांचे डोळे

सुभाष कुलकर्णी । आरंभ मराठी

**तेर : यंदाच्या खरीप हंगामासाठी तेर परिसरातील शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व मशागतीची सर्व कामे पूर्ण केली असून आता पावसाची आतुरतेने वाट पाहत आहेत. मृग नक्षत्राला सुरुवात झाल्याने शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे लागल्या असून वेळेवर आणि समाधानकारक पाऊस पडण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. हवामान खात्यासह विविध हवामान तज्ज्ञांनी यंदा पावसाबाबत कमी पर्जन्यमानाचा अंदाज व्यक्त केल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण आहे. मात्र, या अंदाजाची पर्वा न करता शेतकऱ्यांनी आपल्या शेतजमिनीची मशागत पूर्ण करून पेरणीसाठी शेत तयार ठेवले आहे.**



गतवर्षी मे महिन्यात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना फटका बसला होता. त्यामुळे यावर्षीही मे महिन्यात पाऊस होईल, अशी अपेक्षा अनेकांनी धरली होती. मात्र यंदा परिस्थिती उलट राहिली. मे महिनाभर कडक उन्हाचा तडाखा जाणवत असतानाही शेतकरी उन्हाची तमा न बाळगता शेतात राबत राहिले आणि पेरणीपूर्व मशागतीची कामे वेळेत पूर्ण केली. तेर परिसरात एकूण ३ हजार २४४.६० हेक्टर क्षेत्र असून त्यापैकी सुमारे २ हजार ७०३ हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी केली जाते. या भागात प्रामुख्याने सोयाबीन हे मुख्य पीक असून तूर, मूग आणि उडीद ही दुय्यम पिके घेतली जातात. मृग नक्षत्रात सोयाबीनची पेरणी झाल्यास उत्पादन चांगले मिळते, असा शेतकऱ्यांचा अनुभव असल्याने मृगातील पावसाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. धाराशिव तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांचे अर्थकारण शेतीवरच अवलंबून आहे. मात्र गेल्या काही वर्षांत निसर्गाच्या लहरीपणाचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान होत असून उत्पादनात घट, वाढता उत्पादन खर्च, शेतमालाला मिळणारा कमी दर आणि वाढती महागाई यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय स्तरावरील घडामोडींमुळे इंधनाच्या दरात वाढ झाल्याने मशागतीचा खर्चही मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे मृग नक्षत्रातील चांगला पाऊसच शेतकऱ्यांना दिलासा देणारा ठरणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

### नक्षत्रनिहाय कालावधी

रोहिणी : २५ मे ते ८ जून
मृग : ८ जून ते २२ जून
आर्द्रा : २२ जून ते ६ जुलै
पुनर्वसू : ६ जुलै ते २० जुलै
पुष्य : २० जुलै ते ३ ऑगस्ट
आश्लेषा : ३ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट
मघा : १७ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट
पूर्वा : ३० ऑगस्ट ते १३ सप्टेंबर
उत्तरा : १३ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर
हस्त : २७ सप्टेंबर ते १० ऑक्टोबर
चित्रा : १० ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर
स्वाती : २४ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर

### खताची टंचाई, उडिद आणि मुगाचा पेरा घटणार

शेतकरी मृग नक्षत्रातील पावसाची वाट पाहत असले तरी दुसरीकडे बाजारात रासायनिक खतांची टंचाई निर्माण झाल्याने पेरणीच्या नियोजनात व्यत्यय आला आहे. शेतकऱ्यांना डीएपी खत मिळत नसल्याने शेतकऱ्यांना इतर महागड्या खतांवर अवलंबून रहावे लागत आहे. मृग नक्षत्रात पाऊस नसल्याने यावर्षी उडीद आणि मुगाचा पेरा घटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात चांगला पाऊस झाला तरच मूग आणि उडदाची पेरणी मोठ्या प्रमाणात होत असते.

### रोहिणीच्या अखेरीस पाऊस, मात्र मृग नक्षत्र अजूनही कोरडे

रोहिणी नक्षत्राच्या शेवटच्या दोन दिवसांत परिसरात चांगला पाऊस झाला. या पावसामुळे ऊस पिकाला दिलासा मिळाला असला तरी खरीप हंगामातील पिकांचे भवितव्य हे मृग नक्षत्रातील पावसावरच अवलंबून आहे. मागील आठवड्यात सलग दोन दिवस पाऊस पडला असला तरी त्यानंतर एक आठवड्यापासून उष्णतेत प्रचंड वाढ झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. मागील आठवड्यात झालेला पाऊस मान्सूनपुर्व होता. मृग नक्षत्रात एकही पाऊस न झाल्याने पेरणीच्या हालचाली मंदावल्या आहेत. मृग नक्षत्र सुरू होऊन सहा दिवस झाले तरी अजूनही पावसाची प्रतीक्षा कायम आहे.

### १०० मि.मी. पाऊस झाल्यावरच पेरणी करावी

शेतकऱ्यांनी पेरणी करण्यापूर्वी जमिनीत पुरेशी ओल आहे की नाही हे पाहावे. त्यासाठी किमान १०० मि.मी. पाऊस होणे गरजेचे असल्याची शिफारस कृषी विद्यापीठांनी केली आहे. १५ जुलैपर्यंत सोयाबीन, मूग व उडीद पिकांची पेरणी करता येते. त्यानंतर पेरणी लांबल्यास पीकपद्धतीत बदल करावा लागू शकतो. त्यामुळे पुरेशी ओल झाल्यानंतरच पेरणी करावी.

राम शिंदे
कृषी सहाय्यक.

## महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांच्या प्रचारार्थ नळदुर्ग येथे संवाद मेळावा



आरंभ मराठी । नळदुर्ग

धाराशिव-बीड-लातूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांच्या प्रचारार्थ नळदुर्ग येथे संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात जिल्ह्यातील आजी-माजी आमदार, लोकप्रतिनिधी, नगरसेवक आणि पक्ष पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून महायुतीच्या विजयाचा निर्धार व्यक्त केला..यावेळी औसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, सुनील चव्हाण, नळदुर्ग नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष नय्यर पाशा जागीरदार यांच्यासह महायुतीचे सर्व नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य तसेच विविध पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. संवाद मेळाव्यात महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांनी उपस्थित प्रतिनिधींशी थेट संवाद साधला. यावेळी त्यांनी विकासाभिमुख विचार मांडत स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सर्व लोकप्रतिनिधींनी महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे आवाहन केले. तसेच आगामी निवडणुकीत विक्रमी मताधिक्याने विजय मिळवण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन करत महायुतीच्या विकासाच्या धोरणांवर विश्वास व्यक्त केला. मेळाव्यात उपस्थित पदाधिकाऱ्यांनी आणि लोकप्रतिनिधींनी महायुतीच्या उमेदवाराच्या विजयासाठी पूर्ण ताकदीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. या संवाद मेळाव्यामुळे नळदुर्ग परिसरातील महायुतीच्या निवडणूक प्रचाराला अधिक बळ मिळाल्याचे चित्र दिसून आले.

## १५ जून रोजी धाराशिवमध्ये शिकाऊ उमेदवारी भरती मेळावा

### टाटा मोटर्समध्ये काम करण्याची संधी मिळणार

**धाराशिव** :- व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्रामार्फत औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), धाराशिव येथे १५ जून २०२६ रोजी 'शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले आहे. या भरती मेळाव्यात नामांकित टाटा मोटर्स, पिंपरी (पुणे) कंपनीचे प्रतिनिधी सोमेश्वर सोनवणे उपस्थित राहणार आहेत. या भरती मेळाव्यात मोटार मेकॅनिक, डिझेल मेकॅनिक, फिटर, मशिनिस्ट, टूल अँड डाय मेकर, वेल्डर, शीट मेटल, इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक आदी ट्रेडमधील प्रशिक्षणार्थींनी बायोडाट्यासह उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. भरती प्रक्रियेत अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना अप्रेंटिसशिप कालावधीत प्रतिमाह १९ हजार ८५० रुपये विद्यावेतन देण्यात येणार आहे. याशिवाय महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत प्रतिमाह ३ हजार ५०० रुपये इतकी अतिरिक्त प्रोत्साहनपर रक्कम राज्य शासनाकडून दिली जाणार आहे. जुलै २०२६ मध्ये अंतिम वर्षाच्या परीक्षेस पात्र होणाऱ्या प्रशिक्षणार्थींनीही या भरती मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच यापूर्वी आयटीआय किंवा एमसीव्हीसी उत्तीर्ण झालेल्या आणि अद्याप शिकाऊ उमेदवारी (Apprenticeship) न मिळालेल्या प्रशिक्षणार्थींनाही ही सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. हा भरती मेळावा १५ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता भाई उद्धवराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धाराशिव येथे होणार असून इच्छुक उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे व बायोडाटा घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य तसेच सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार एम.एस.बिरादार यांनी केले आहे.

## एस. आर. दळवी फाउंडेशनच्या राज्याध्यक्षपदी रमेश माने यांची निवड

आरंभ मराठी । पळसप

शिक्षक सक्षमीकरण आणि पर्यावरण संरक्षण या महत्त्वपूर्ण सामाजिक विषयांवर कार्यरत असलेल्या एस. आर. दळवी फाउंडेशनच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीची नुकतीच घोषणा करण्यात आली. या कार्यकारिणीत लातूर येथील रमेश माने यांची महाराष्ट्र राज्याध्यक्षपदी निवड करण्यात आली असून, पुणे येथील नितिन मेमाणे यांची राज्य सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय, अहिल्यानगर येथील अभिजित दळवी आणि सोलापूर येथील पूनम चव्हाण यांची उपाध्यक्षपदी, तर वरुणाक्षी आंद्रे यांची सहसचिवपदी निवड करण्यात आली आहे. सातारा येथील मोहन पाटील यांच्यावर ज्येष्ठ सल्लागार म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे. फाउंडेशनचे संस्थापक रामचंद्र



नितीन मेमाने




रमेश माने

(आबा) दळवी आणि सौ. सीता दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर विविध सामाजिक, शैक्षणिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. कल्पक शिक्षक, पर्यावरणप्रेमी, विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या सक्रिय सहभागातून वृक्षारोपण, प्लास्टिक निर्मूलन, कचऱ्याचे पुनर्चक्रीकरण, शिक्षक प्रशिक्षण, विद्यार्थी-शिक्षक स्पर्धा तसेच पर्यावरण संवर्धनाविषयी जनजागृती करणाऱ्या कार्यशाळांचे आयोजन केले जाते. नवीन राज्याध्यक्ष म्हणून रमेश माने यांच्या निवडीमुळे फाउंडेशनच्या कार्याला अधिक व्यापक दिशा मिळेल, तसेच शिक्षक सक्षमीकरण आणि पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला राज्यभर अधिक बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. रमेश माने यांच्या निवडीबद्दल प्रा. शिवाजी सूर्यवंशी, प्रकाश घादगीने, चंद्रकांत उळेकर, कॅप्टन बाळासाहेब गोडबोले आणि सतीश सातपुते यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## शिक्षण क्षेत्रातील दीपस्तंभ हरपला; शिक्षणमहर्षी बाबुराव बिराजदार यांचे निधन

आरंभ मराठी । येणेगूर



उमरगा तालुक्यातील येणेगूर येथील श्री परमहंस शिक्षण संस्थेचे संस्थापक सचिव, कॅप्टन जोशी स्मारक विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक तथा शिक्षणमहर्षी बाबुराव आनंदराव बिराजदार (वय ८९) यांचे शुक्रवार (दि. १२) रोजी पहाटे अल्पशा आजाराने सोलापूर येथील मार्कंडेय रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या निधनाने येणेगूर परिसरासह शैक्षणिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे. बाबुराव बिराजदार यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी आयुष्यभर कार्य केले. श्री परमहंस शिक्षण संस्थेच्या उभारणीत त्यांचे मोलाचे योगदान राहिले. मुख्याध्यापक म्हणून त्यांनी अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा दिली. त्यांच्या शिस्तप्रिय, कर्तव्यदक्ष आणि विद्यार्थीहित जपणाऱ्या कार्यपद्धतीमुळे ते शिक्षण क्षेत्रात आदराचे स्थान प्राप्त करू शकले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी सायंकाळी येणेगूर येथील करीबसवेश्वर मठ स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर, शिक्षणप्रेमी, माजी विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते श्री परमहंस शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष देवराज बिराजदार यांचे वडील होत.

## एआयमुळे रोजगाराच्या नव्या संधी या विषयावर तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात तज्ज्ञांचे मार्गदर्शन

आरंभ मराठी । धाराशिव




तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कृत्रिम बुद्धिमत्ता व डेटा सायन्स विभागाच्या वतीने 'एआय आणि डेटा सायन्स क्षेत्रातील करिअर व रोजगाराच्या संधी' या विषयावर फिनसॉफ्टएआयचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेन्द्र अभ्यंकर यांचे ऑनलाइन तज्ज्ञ व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने होते. विभागप्रमुख प्रा. प्रदीप पवार, मानव संसाधन विभाग प्रमुख अनुराधा देशपांडे, प्राध्यापक, माजी विद्यार्थी तसेच तृतीय व अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. प्राचार्य डॉ. माने यांनी विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता उद्योगाभिमुख प्रकल्पांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. तसेच महाविद्यालयात एआय व डेटा सायन्स शाखा २०२०-२१ मध्ये सुरू करण्यात आली असून परिसरातील अशा प्रकारची ही पहिली शाखा असल्याचे सांगितले. प्रमुख वक्ते शैलेन्द्र अभ्यंकर यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, डेटा सायन्स आणि जनरेटिव्ह एआय क्षेत्रात भविष्यात मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होणार असल्याचे सांगितले. एआयमुळे नोकऱ्या संपणार नसून त्यांचे स्वरूप बदलणार आहे. आरोग्य, वित्त, कृषी, ऊर्जा, उत्पादन क्षेत्र तसेच अवकाश संशोधन यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये एआयचा वाढता वापर रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी आपल्या मूलभूत अभियांत्रिकी ज्ञानासोबत एआय आधारित कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी उद्योग क्षेत्रातील अपेक्षा, भरती प्रक्रियेतील बदल आणि करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. तेरणा महाविद्यालयातील प्रशिक्षण, प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि रिअल टाईम प्रकल्पांच्या उपक्रमांचेही त्यांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संदीप टेकाळे यांनी केले, तर आभारप्रदर्शन विभागप्रमुख प्रा. प्रदीप पवार यांनी केले.

## आरंभ मराठी | 20 अकुशल कर्मचाऱ्यांच्या तात्काळ नेमणुकीची मागणी

# घनकचरा ठेका संपताच भूमची स्वच्छता व्यवस्था कोलमडली

आरंभ मराठी । भूम



भूम नगर परिषद हद्दीतील घनकचरा व्यवस्थापनाचा ठेका 31 मे रोजी संपुष्टात आल्यामुळे शहरातील स्वच्छता व्यवस्था विस्कळीत झाली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर जनशक्ती नगर विकास आघाडीचे गटनेते रुपेश (अप्पा) परमेश्वर शेंडगे यांनी मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे लागू असलेल्या आचारसंहितेमुळे सर्वसाधारण सभा घेणे शक्य होत नसल्याने नवीन निर्णय प्रक्रियेला विलंब होत आहे. परिणामी शहरातील स्वच्छता व्यवस्थेवर विपरीत परिणाम झाला असून अनेक भागांत कचऱ्याचे ढीग साचले आहेत. दरम्यान, पावसाळ्याच्या तोंडावर नाल्यांची नियमित साफसफाई होत नसल्याने नाले तुंबण्याचा धोका निर्माण झाला आहे. साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती वाढून डेंग्यू, मलेरिया यांसारख्या संसर्गजन्य आजारांचा प्रादुर्भाव होण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे. महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, 1965 नुसार सार्वजनिक स्वच्छता राखणे ही नगर परिषदेची मूलभूत जबाबदारी असल्याचे सांगत, सद्यस्थिती अत्यंत चिंताजनक असल्याचे शेंडगे यांनी निवेदनात नमूद केले आहे. शहरातील स्वच्छता व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी घंटागाडी सेवा व नाली सफाईसाठी तात्काळ 20 अकुशल कर्मचाऱ्यांची तात्पुरती नेमणूक करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. स्वच्छता ही अत्यावश्यक व अनिवार्य सेवा असल्याने कोणताही विलंब न करता प्रशासनाने त्वरित कार्यवाही करावी, असेही निवेदनात म्हटले आहे. यावेळी जनशक्ती नगर विकास आघाडीचे गटनेते रुपेश (अप्पा) शेंडगे, बांधकाम तथा स्वच्छता सभापती अनिल दादा शेंडगे, नियोजन सभापती रामराजे कुंभार, नगरसेवक चंद्रमणी गायकवाड, विठ्ठल बागडे, अमोल गाडे, दीपक पवार तसेच अनेक नागरिक उपस्थित होते.

## गटशिक्षणाधिकारी मल्लिनाथ काळे यांचा राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाकडून गौरव



आरंभ मराठी । तुळजापूर

पंचायत समिती तुळजापूर येथील गटशिक्षण कार्यालयात गटशिक्षणाधिकारी पदावर पदोन्नती झाल्याबद्दल मल्लिनाथ काळे यांचा राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने राज्य, जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. प्रशासनातील कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून कार्य करताना तसेच त्यांच्या प्रभावी मार्गदर्शनामुळे तुळजापूर तालुक्यातील शिक्षणाच्या गुणवत्तेचा स्तर उंचावण्यास त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत प्रशासनाने त्यांची गटशिक्षणाधिकारी पदावर नियुक्ती केली. या पदोन्नतीबद्दल संघटनेच्या वतीने त्यांचा प्रतिमा, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच त्यांच्या पुढील शैक्षणिक व प्रशासकीय कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.या सत्कार समारंभास राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे राज्य सरचिटणीस संतोष भोजने, प्रदेश उपाध्यक्ष सुखदेव भालेकर, राज्य नेते सतीश हुंडेकरी, युवा स्पंदन संस्थापक तथा हेडगेवार रक्तपेढीचे संचालक महेंद्र कावरे, जिल्हा कार्याध्यक्ष दिगंबर हुंडेकरी, जिल्हाध्यक्ष अनंत फुलसुंदर, विठ्ठल म्हेत्रे, जिल्हा सरचिटणीस दीपक हजारे, विष्णू दळवी, ज्योतिर्लिंग क्षीरसागर, अशोक चव्हाण, विशाल जाधव, तालुका अध्यक्ष शरद सोनटक्के, विजय भालेकर, शेखु जेटीथोर, प्रमोद चौधरी, ज्ञानेश्वर घोडके, राजेंद्र हजारे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुखदेव भालेकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार शरद सोनटक्के यांनी मानले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# गढूळ पाण्याने मुरूमकरांचे आरोग्य धोक्यात; सत्ताधाऱ्यांच्या निष्क्रियतेविरोधात संताप

- अनेक महिन्यांपासून दूषित पाणीपुरवठ्याची समस्या कायम
- स्वच्छ पाण्याच्या आश्वासनांची आठवण करून देत नागरिक आक्रमक

आरंभ मराठी । मुरूम

मुरूम शहरात गेल्या अनेक महिन्यांपासून होत असलेल्या गाळमिश्रित व दूषित पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून सत्ताधाऱ्यांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शहरातील अनेक भागांमध्ये नळांमधून पिवळसर, गढूळ व दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. मुरूम नगरपरिषदेत अनेक वर्षे काँग्रेसची सत्ता होती व आता भाजपची सत्ता आहे. मात्र सत्ताधारी तेच आहेत. माजी राज्यमंत्री बसवराज पाटील यांनी पक्षांतर केल्यानंतर झालेल्या निवडणुकीत त्यांचे बंधु बापूराव पाटील हे विद्यमान नगराध्यक्ष आहेत. एकहाती पाटील कुटुंबाचे नगरपरिषदेवर अनेक वर्ष वर्चस्व आहे. पक्ष बदलला सत्ता त्यांच्या ताब्यात आहे. परंतु पिण्याच्या पाण्याची परिस्थिती जैसे थे तशीच आहे. विशेष म्हणजे, निवडणुकीच्या काळात नागरिकांना स्वच्छ व शुद्ध पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन देणारे सत्ताधारी या गंभीर प्रश्नावर मौन बाळगून असल्याची टीका नागरिकांतून होत आहे. वचननाम्यातील आश्वासने पूर्ण करण्याऐवजी समस्या दुर्लक्षित केल्या जात असल्याने जनतेत नाराजी वाढत आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, दूषित पाण्यामुळे गॅस्ट्रो, डायरिया, पोटाचे विकार तसेच इतर जलजन्य आजारांचा धोका वाढला आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व आजारी व्यक्तींना याचा सर्वाधिक फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सुरक्षित पिण्याच्या पाण्यासाठी अनेक कुटुंबांना जारचे पाणी विकत घ्यावे लागत असल्याने सर्वसामान्यांच्या खिशावर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे. दरम्यान, शहरातील जलवाहिन्यांमध्ये गळती, पाणीपुरवठा यंत्रणेतील बिघाड तसेच गावठाण परिसरात रस्त्यालगत अनेक ठिकाणी फुटलेल्या गटारी व नळांच्या खड्ड्यांमुळे गटारीचे दूषित पाणी जलवाहिनीत मिसळत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. काही ठिकाणी नळांचे तोंड कायम उघडे राहत असल्याने त्यातून घाण पाणी आत जात असल्याची शक्यताही नागरिकांनी वर्तवली आहे. याबाबत नागरिकांनी अनेकदा नगरपरिषद प्रशासनाकडे तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना झालेली नसल्याचा आरोप केला आहे. प्रशासनाकडून केवळ 'दुरुस्ती सुरू आहे' अशीच उत्तरे मिळत असल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.



### नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे

स्वच्छ पिण्याचे पाणी हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे. अनेक महिन्यांपासून दूषित पाणीपुरवठा होत असताना सत्ताधाऱ्यांनी केवळ आश्वासनांवर वेळ मारून नेणे अत्यंत दुर्दैवी आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे. तातडीने उपाययोजना न झाल्यास लोकशक्तीच्या माध्यमातून तीव्र आंदोलन उभारले जाईल.

**सिद्धलिंग हिरेमठ,**
**सामाजिक कार्यकर्ते.**

### अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल

मुरूम शहरातील नागरिकांना गेल्या अनेक महिन्यांपासून गढूळ व दूषित पाण्याचा सामना करावा लागत आहे. हा केवळ पाणीपुरवठ्याचा प्रश्न नसून नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित अत्यंत गंभीर विषय आहे. नगरपरिषद प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांनी या समस्येकडे दुर्लक्ष केल्यामुळे आज नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. निवडणुकीत स्वच्छ व शुद्ध पाणीपुरवठ्याची ग्वाही देणारे सत्ताधारी आता मात्र या प्रश्नावर मौन बाळगत आहेत. तत्काळ जलवाहिन्यांची तपासणी करून दोष दूर करावेत व नागरिकांना स्वच्छ पाणी उपलब्ध करून द्यावे, अन्यथा नागरिकांसोबत रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडले जाईल.

**अजित चौधरी,**
**विरोधी नगरसेवक, मुरूम.**

### नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी हेच पाणी पितात का ?

सत्ताधारी हे फक्त सत्ता व त्यातून पैसा याच गोष्टीच्या मागे लागून सर्वसामान्य लोकांच्या जीविताशी खेळण्याचा प्रयत्न करत आहेत. काँग्रेस असो की भाजप; सत्ता यांचीच. जनावरे पिऊ शकत नाहीत असे पाणी सर्वसामान्य मुरूमकरांना प्यावं लागत आहे. एक मुरूमकर म्हणून मला असा प्रश्न पडतो की जनतेमधून निवडून आलेले नगराध्यक्ष तसेच मुख्याधिकारी हेच पाणी पितात का? जनावरेही जे पाणी पित नाहीत असं पाणी सामान्य मुरूमकरांना किती दिवस पाजणार?

**— लखन भोंडवे,**
**सामाजिक कार्यकर्ते.**

## खामगाव येथे कृषीदूतांकडून बियाणे उगवणक्षमता तपासणीबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन



आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव तालुक्यातील खामगाव येथे आळणी येथील कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण कृषी कार्यानुभव (RAWE) कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात पेरणीपूर्वी बियाणांची उगवणक्षमता तपासण्याचे महत्त्व, त्यामागील शास्त्रीय कारणे तसेच उगवण क्षमता तपासण्याची शास्त्रोक्त पद्धत कृषीदूतांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे शेतकऱ्यांना समजावून सांगितली. यावेळी कृषीदूतांनी दर्जेदार बियाणांची निवड आणि योग्य उगवणक्षमता सुनिश्चित केल्यास पिकांची उगवण चांगली होऊन उत्पादनवाढीस मोठी मदत होते, असे मार्गदर्शन केले. तसेच गुणवत्तापूर्ण बियाण्यांच्या वापरातून उत्पादन वाढविण्यासाठी आवश्यक तांत्रिक माहितीही शेतकऱ्यांना देण्यात आली. या उपक्रमास सरपंच अमर शिंगारे, बालाजी शिंगारे, गणेश अंधारे, सागर काटवटे, शहाजी शिंगारे, हनुमंत काटवटे, देवीदास शिंगारे, किसन उगले यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते. दरम्यान, शेतकऱ्यांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत बीज निवड, उगवण क्षमता आणि पेरणीपूर्व नियोजनासंदर्भात विविध प्रश्न विचारून माहिती जाणून घेतली. यावेळी कृषीदूत संदीप चव्हाण, प्रतीक कांबळे, मयुर भिसे, औदुंबर ढेकणे, प्रतीक बनसोडे, सुशील वैध, अभिषेक विभुते, प्रतीक सोनवणे आणि रोहित ओंडकर उपस्थित होते.

## पीएमश्री उर्दू शाळेत 'क्लीन स्कूल' संकल्पना; शाळा पूर्वतयारीला वेग

आरंभ मराठी । तेर

धाराशिव तालुक्यातील तेर येथील पीएमश्री जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक व माध्यमिक शाळा सोमवार, दिनांक १५ जूनपासून सुरू होत असून, नवीन शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर शाळेत व्यापक स्वच्छता व पूर्वतयारीची कामे हाती घेण्यात आली आहेत. शाळेचे मुख्याध्यापक तय्यबअली शहा यांनी 'आपली शाळा – क्लीन शाळा' ही संकल्पना राबवत विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ, सुरक्षित आणि आनंददायी वातावरण निर्माण करण्याचा उपक्रम सुरू केला आहे. शाळा पूर्वतयारीचा भाग म्हणून १२ जून रोजी शाळेच्या परिसरातील अनावश्यक झुडपे व फांद्यांची छाटणी करण्यात आली. तसेच शालेय पोषण आहार अंतर्गत असलेल्या स्वयंपाकगृहाची सखोल स्वच्छता करण्यात आली. विद्यार्थ्यांना शुद्ध व स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी पाण्याची टाकी, हँडवॉश सेंटर आणि आरओ



फिल्टर वॉटर सेंटरचीही साफसफाई करण्यात आली. याशिवाय संपूर्ण शाळा परिसर स्वच्छ व आकर्षक ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. शाळेत प्रवेश करताना विद्यार्थ्यांना उत्साहवर्धक, आनंददायी आणि सकारात्मक वातावरण अनुभवता यावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे मुख्याध्यापक तय्यबअली शहा यांनी सांगितले. नवीन शैक्षणिक वर्षाच्या स्वागतासाठी शाळा सज्ज झाली असून, विद्यार्थ्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम आदर्श ठरत आहे.

## लोकसहभागातून घडली आदर्श शाळा; सरमकुंडी जिल्हा परिषद शाळेची विकासाकडे वाटचाल

**वाशी** :- 'शाळेला गावाचा आधार आणि गावाला शाळेचा अभिमान' या उक्तीप्रमाणे गावकऱ्यांच्या सहकार्याने जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सरमकुंडीने विकासाची उल्लेखनीय वाटचाल सुरू केली आहे. ग्रामस्थांनी दिलेल्या भरभरून सहकार्यामुळे शाळेचे संपूर्ण रूपडे बदलले असून आज ही शाळा विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांसाठी अभिमानाचा विषय ठरत आहे. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सरमकुंडी येथे इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतचे वर्ग असून सुमारे 230 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळेत दहा शिक्षक कार्यरत असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. 'मज आवडते ही मनापासुनी शाळा, लाविते लळा ही जसा माऊली बाळा' या भावनेप्रमाणे विद्यार्थ्यांना शाळेचा लळा लागला असून शाळेतील वातावरण आनंददायी व प्रेरणादायी बनले आहे. विशेष म्हणजे उन्हाळी सुट्टीच्या कालावधीतही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी इंग्रजी व गणित विषयांच्या विशेष तयारीसाठी उन्हाळी वर्ग सुरू ठेवण्यात आले आहेत.शाळेच्या परिसरात स्वच्छता, आकर्षक रंगरंगोटी, सुशोभित वर्गखोल्या, शैक्षणिक भित्तीचित्रे, विविध शैक्षणिक साधने तसेच हिरवागार परिसर यामुळे शाळेचे सौंदर्य अधिक खुलले आहे. विद्यार्थ्यांना आनंददायी व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी शाळेत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक कल्याणराव सुरवसे आणि सर्व शिक्षकांच्या अथक प्रयत्नांमुळे शाळेत डिजिटल शिक्षण, वाचन संस्कृती, क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विविध स्पर्धांना प्रोत्साहन मिळत आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी विशेष अध्यापन पद्धतींचा वापर करून शैक्षणिक स्तर उंचावण्याचा सातत्याने प्रयत्न केला जात आहे. यासोबतच शाळेच्या परिसरात वृक्षारोपण, स्वच्छता अभियान आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन व सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण केली जात आहे. पालकांचा वाढता सहभाग आणि ग्रामस्थांचे आर्थिक व सामाजिक सहकार्य यामुळे शाळेच्या विकासाला मोठी चालना मिळाली आहे.

## आचारसंहिता संपताच भूम शहरातील नागरी सुविधा पूर्ववत करणार

### नगराध्यक्षा संयोगिता गाढवे यांचे आश्वासन



आरंभ मराठी । भूम

भूम शहरातील घनकचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा, रस्ते दिवे आणि इतर मूलभूत नागरी सुविधांबाबत निर्माण झालेल्या समस्यांवर आचारसंहिता संपल्यानंतर तातडीने उपाययोजना करून सर्व व्यवस्था सुरळीत करण्यात येईल, असे आश्वासन नगराध्यक्षा संयोगिता गाढवे यांनी दिले आहे. प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात नगराध्यक्षा गाढवे यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाने जनतेतून थेट निवडून आलेल्या नगराध्यक्षांना दिलेल्या अधिकारांचा वापर करून शहरातील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी नगर परिषद कटिबद्ध आहे. मात्र सध्या सुरू असलेल्या विधान परिषद निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे अनेक प्रशासकीय निर्णय आणि विकासकामांवर निर्बंध आले असून काही महत्त्वाच्या कामांना विलंब झाला आहे. नगराध्यक्षा गाढवे यांनी विरोधकांवर आरोप करताना म्हटले की, नगर परिषदेतील कुशल व अकुशल कर्मचाऱ्यांच्या मानधनवाढीच्या प्रस्तावाला विरोध करण्यात आला. त्यामुळे सुमारे १५ ते २० कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्याची वेळ आली. जे विरोधक त्या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम ठेवण्यास विरोध करत होते, तेच आता कामगार भरतीची मागणी करत असल्याचा आरोप त्यांनी केला. घनकचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा आणि विद्युत देखभालीसाठी आवश्यक निविदा प्रक्रिया फेब्रुवारी महिन्यात पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र या प्रक्रियेत वारंवार अडथळे निर्माण झाल्याने टेंडर वेळेत पूर्ण होऊ शकले नाहीत. परिणामी शहरातील अनेक मूलभूत सेवा विस्कळीत झाल्या असून त्याचा फटका नागरिकांना बसत असल्याचे त्यांनी नमूद केले. घनकचरा व्यवस्थापनासाठी नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे शहरातील घंटागाडी सेवा ठप्प झाली आहे. त्यामुळे नागरिकांना घरगुती कचरा विल्हेवाट लावण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या असून अनेक ठिकाणी रस्त्यांच्या कडेला कचऱ्याचे ढिग साचल्याचे चित्र दिसत आहे. उपलब्ध मनुष्यबळ अपुरे असल्याने साचलेला कचरा वेळेत उचलणे शक्य होत नसल्याचेही नगर परिषदेकडून सांगण्यात आले आहे. शहरात ठिकठिकाणी कचरा साचत असल्याने डास, माश्या आणि इतर रोगकारक घटकांची वाढ होण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रो यांसारख्या संसर्गजन्य आजारांचा धोका वाढला असून नागरिकांमध्ये आरोग्याबाबत चिंता निर्माण झाली आहे. आचारसंहिता समाप्त होताच घनकचरा व्यवस्थापनाची निविदा प्रक्रिया पूर्ण करणे, आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, पाणीपुरवठा सुरळीत करणे, रस्ते दिव्यांची दुरुस्ती आणि इतर नागरी सुविधा पूर्ववत करण्यासाठी तातडीने निर्णय घेतले जातील, असे नगराध्यक्षा संयोगिता गाढवे यांनी स्पष्ट केले.

**दैनिक आरंभ मराठी** | शेळीपालन ठरले प्रगतीचे साधन; कावळेवाडीच्या गोविंद लोमटे यांची प्रेरणादायी यशोगाथा

## दोन शेळ्यांपासून 100 शेळ्यांपर्यंतचा यशस्वी प्रवास; गोविंद लोमटे यांनी शेळीपालनातून साधली आर्थिक प्रगती

आरंभ मराठी । पळसप

ग्रामीण भागात शेतीपूरक व्यवसाय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शेळीपालनातून अनेक तरुण आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग शोधत आहेत. धाराशिव तालुक्यातील कावळेवाडी येथील तरुण पशुपालक शेतकरी गोविंद बिभीषण लोमटे यांनीही आपल्या जिद्द, मेहनत आणि योग्य नियोजनाच्या बळावर शेळीपालन व्यवसायात उल्लेखनीय यश संपादन करत इतरांसमोर आदर्श निर्माण केला आहे.अत्यंत साध्या पद्धतीने केवळ दोन शेळ्यांपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास आज १०० शेळ्या आणि ५ बोकडांपर्यंत पोहोचला आहे. सातत्यपूर्ण परिश्रम, दूरदृष्टी आणि आधुनिक व्यवस्थापन यामुळे त्यांनी शेळीपालन व्यवसायाला व्यावसायिक स्वरूप दिले आहे. या व्यवसायातून ते दरवर्षी सुमारे २५ ते ३० लाख रुपयांची आर्थिक उलाढाल करत असून आर्थिकदृष्ट्या भक्कम उभारी घेतली आहे. व्यवसायाचा विस्तार करताना गोविंद लोमटे यांनी "शिवसंकेत फार्मर प्रोड्युसर



कंपनी"ची स्थापना केली. या माध्यमातून ते परिसरातील शेतकरी व पशुपालकांसाठी शेळीपालन प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन करून मार्गदर्शन करतात. त्यांच्या अनुभवाचा लाभ घेत अनेक नवोदित युवक शेळीपालनाकडे वळत आहेत. शासनाच्या पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पशुधन अभियान (नॅशनल लाईव्ह स्टॉक मिशन) योजनेचा लाभ घेत त्यांनी १०० शेळ्यांसाठी आधुनिक संगोपनगृह उभारले आहे. या प्रकल्पाच्या उभारणीत पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले. तसेच व्यवसाय वृद्धीसाठी धाराशिव येथील युनियन बँकेकडून मिळालेल्या आर्थिक सहाय्यामुळे त्यांच्या व्यवसायाला अधिक बळ मिळाले. शेळ्यांच्या पोषणासाठी त्यांनी एक एकर क्षेत्रावर विविध प्रकारचा हिरवा चारा पिकवून स्वयंपूर्ण चारा व्यवस्थापन उभारले आहे. त्यामुळे खाद्यखर्चात मोठी बचत होत असून व्यवसायातील नफाही वाढला आहे. त्यांच्या या प्रगत शेळीपालन प्रकल्पाला परिसरातील अनेक पशुपालक आणि शेतकरी भेट देऊन प्रत्यक्ष माहिती घेत आहेत.लोमटे यांच्या प्रकल्पाची पाहणी करण्यासाठी पशुसंवर्धन आयुक्त, सहाय्यक आयुक्त, उपायुक्त तसेच विभागातील इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वेळोवेळी भेटी देऊन मार्गदर्शन केले आहे. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनीही प्रत्यक्ष भेट देत त्यांच्या जिद्द, चिकाटी आणि यशस्वी वाटचालीचे कौतुक केले.



### ग्रामीण तरुणांना रोजगारासह आर्थिक स्थैर्य मिळू शकते

शेळीपालन हा व्यवसाय योग्य नियोजन, मेहनत आणि सातत्य यांच्या बळावर अत्यंत फायदेशीर ठरू शकतो. शेतीसोबत जोडधंदा म्हणून शेळीपालन स्वीकारल्यास ग्रामीण तरुणांना रोजगारासह आर्थिक स्थैर्य मिळू शकते.ग्रामीण भागातील युवकांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शासनाच्या योजनांचा लाभ आणि योग्य व्यवस्थापनाचा अवलंब केल्यास शेळीपालनातूनही मोठे यश मिळविता येते.

**गोविंद लोमटे**
**उद्योजक,**